ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 10 | JUNE - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "भारताच्या महिलांच्या भूमिकेवरील ऐतिहासिक दृष्टीकोन – प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक"



प्रा. प्रिया प्रताप खवळे
अर्थशास्त्र विभाग ,
श्री.स.ह.केळकर महाविद्यालय,देवगड जि.सिंधुदुर्ग.

**गोषवारा :-**

प्रस्तुत संशोधनात भारतीय इतिहासातील प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील महिलांच्या स्थानाचा ऐतिहासिक व विश्लेषणात्मक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. समाजव्यवस्थेतील बदल, राजकीय परिस्थिती, धार्मिक मुल्ये आणि सामाजिक सुधारणा चळवळी यांच्या प्रभावामुळे महिलांच्या भूमिकेत झालेल्या परिवर्तनाचा मागोवा होणे हा अभ्यासाचा उद्देश आहे. ऐतिहासिक आणि गुणात्मक पद्धतींचा अवलंब करून विविध प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा अभ्यास करण्यात आला आहे. प्राचीन काळात महिलांना शिक्षण व वैचारिक सहभागाची संधी उपलब्ध होती तर मध्ययुगीन काळात त्यांचे स्थान मर्यादित झाले. आधुनिक काळात समाजसुधारकांच्या कार्यामुळे आणि भारतीय राज्यघटनेतील समानतेच्या तत्त्वामुळे महिलांच्या स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली. या अभ्यासातून महिलांच्या भूमिकेतील सातत्य व परिवर्तन यांचे विश्लेषण करून सामाजिक समतेच्या दिशेने झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे.

**की-वर्ड्स –** महिला सशक्तीकरण, ऐतिहासिक परिवर्तन, स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणा, समानता, भारतीय राज्यघटना, लिंगसमानता.

## प्रस्तावना :-

भारतीय समाजरचनेत महिलांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे. तथापि विविध ऐतिहासिक कालखंडामध्ये त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अधिकारांमध्ये लक्षणीय बदल झालेले दिसून येतात. प्राचीन काळातील स्त्रियांचे स्थान, मध्ययुगीन काळातील सामाजिक बंधने आणि

आणि आधुनिक काळातील सुधारणा यांचा अभ्यास केल्यास महिलांच्या भूमिकेतील परिवर्तन स्पष्ट होते.

ऋग्वेदामधील उल्लेखांवरून प्राचीन काळात स्त्रियांना वैचारिक स्वातंत्र्य होते हे दिसून येते. गार्गी आणि मैत्रेयी या विदुषींची उदाहरणे त्याची साक्ष देतात. मध्ययुगीन काळात मात्र पितृसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रियांचे स्थान मर्यादित झाले तरीही रझिया सुलतान आणि राणी लक्ष्मीबाई यांनी नेतृत्व व पराक्रम सिद्ध केला.

आधुनिक काळात सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय आणि डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या कार्यामुळे महिलांना कायदेशीर व सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

१) प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील महिलांच्या स्थानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२) महिलांच्या भूमिकेतील ऐतिहासिक परिवर्तनाचे विश्लेषण करणे.
३) समाजसुधारकांच्या कार्याचा महिलांच्या उन्नतीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
४) तीनही कालखंडाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहीतके :-

१) प्राचीन काळात महिलांचे स्थान तुलनेने उच्च होते.
२) सामाजिक सुधारणा चळवळींमुळे महिलांच्या स्थितीत सकारात्मक बदल झाला.
३) संविधानिक समानतेमुळे महिलांचे कायदेशीर स्थान मजबूत झाले.

## संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन गुणात्मक स्वरूपाचे असून ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतींवर आधारित आहे. दुय्यम स्त्रोतांचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आहे. विविध इतिहास ग्रंथ, संशोधन लेख आणि चरित्रात्मक साहित्याचा संदर्भ घेऊन कालखंडनिहाय विश्लेषण करण्यात आले आहे.

## महितीचे विश्लेषण :-

१) प्राचीन काळातील महिलांची भूमिका –

प्राचीन भारतातील महिलांच्या स्थानाचा अभ्यास केल्यास वैदिक काळात महिलांना तुलनेने सन्मानीय स्थान प्राप्त होते, असे दिसून येते. वैदिक समाजरचनेत महिलांना शिक्षणाचा अधिकार होता.

होता. ऋग्वेदामधील ऋचांमध्ये स्त्रियांनी रचलेल्या मंत्रांचा उल्लेख आढळतो. गार्गी आणि मैत्रेयी सारख्या विदुषींनी तत्वज्ञानपर चर्चांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता.

महिलांना / स्त्रियांना धार्मिक विधीमध्ये सहभागाची संधी होती. 'उपनयन' संस्कार आणि वैदिक अध्ययनाची संधी काही प्रमाणात स्त्रियांना उपलब्ध होती. यावरून त्यांना बौद्धिक स्वातंत्र्य लाभले होते हे स्पष्ट होते. विवाहसंस्थेतही महिलांची भूमिका सहधर्मचारिणी म्हणून मान्य होती. तथापि उत्तरवैदिक काळात सामाजिक रचना अधिक रूढ होत गेल्यामुळे स्त्रियांच्या अधिकारामध्ये हळूहळू घट होत गेली. त्यामुळे प्राचीन काळात महिलांचे स्थान पूर्णपणे समानतेचे नसले, तरी त्या काळाच्या तुलनेत ते सन्मानीय व सहभागात्मक होते असे म्हणता येते.

२) मध्ययुगीन काळातील महिलांची स्थिती –

मध्ययुगीन काळात राजकीय अस्थिरता, परकीय आक्रमणे आणि पितृसत्ताक व्यवस्थेची बळकटी यांमुळे महिलांचे स्थान लक्षणीय खालावले. पडदा पद्धती, बालविवाह आणि सतीप्रथा यांसारख्या प्रथांचा प्रभाव वाढला. स्त्रियांचे शिक्षण मर्यादित झाले आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग कमी झाला. तथापि, याकाळातही काही महिलांनी असामान्य नेतृत्व सिद्ध केले. रझिया सुलतान यांनी दिल्लीच्या सुलतान पदाची जबाबदारी सांभाळून प्रशासकीय कौशल्य दाखवले. तसेच राणी लक्ष्मीबाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात पराक्रम गाजवून स्त्रीशौर्याचे उदाहरण निर्माण केले.

यावरून असे दिसून येते की, सामाजिक बंधने असून ही स्त्रियांनी योग्य संधी मिळाल्यास नेतृत्व आणि पराक्रम सिद्ध केला.

३) आधुनिक काळातील महिलांचे सशक्तीकरण –

आधुनिक काळात सामाजिक सुधारणा चळवळी आणि औपनिवेशिक काळातील नवचेतना यांमुळे महिलांच्या उन्नतीसाठी प्रयत्न सुरु झाले. स्त्रीशिक्षणाचा प्रसार हा या काळातील महत्त्वाचा टप्पा होता. सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरु करून शिक्षणाचा पाया घातला. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या विरोधात आवाज उठवून सामाजिक सुधारणांचा मार्ग मोकळा केला. पुढे डॉ.आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरुष समानतेची तरतूद करून महिलांना कायदेशीर व घटनात्मक अधिकार दिले.

स्वातंत्र्यानंतर महिलांना शिक्षण, रोजगार, राजकारण आणि प्रशासन क्षेत्रात सहभागाची संधी वाढली. आरक्षण धोरण, स्वयं-सहाय्यता गट आणि महिला सक्षमीकरणाच्या योजना यांमुळे त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा झाली. यामुळे आधुनिक काळात महिलांचे स्थान केवळ कुटुंबापुरतेच मर्यादित न राहता सार्वजनिक जीवनात ही प्रभावी बनले आहे.

## तुलनात्मक विश्लेषण

भारतातील प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील महिलांच्या स्थानांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास सामाजिक रचनेतील बदलांचा त्यांच्या जीवनावर थेट परिणाम झाल्याचे दिसून येते.

| अ. . | घटक | प्राचीन काळ | मध्ययुगीन काळ | आधुनिक काळ |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण | मर्यादित पण उपलब्ध, वैदिक अध्ययनाची संधी | अत्यंत मर्यादित | व्यापक प्रसार, स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन |
| २ | सामाजिक स्थान | सहधर्मचारिणी म्हणून मान्यता | पितृसत्ताक नियंत्रणाखाली | समानतेचा घटनात्मक अधिकार |
| ३ | राजकीय सहभाग | नगण्य पण उल्लेखनीय उदाहरणे | अपवादात्मक नेतृत्व उदा.रझिया सुलतान | मतदानाचा अधिकार, आरक्षण व्यवस्था |
| ४ | कायदेशीर अधिकार | रूढी व परंपरावर आधारित | मर्यादित | भारतीय राज्यघटनेद्वारे समानता |

या तुलनेतून स्पष्ट होते की, महिलांच्या भूमिकेत सातत्य आणि परिवर्तन दोन्ही आढळतात. प्राचीन काळात सन्मानाचे स्थान असले तरी ते सर्वसमावेशक नव्हते. मध्ययुगीन काळात सामाजिक बंधने वाढली. तर आधुनिक काळात घटनात्मक आणि कायदेशीर आधारामुळे महिलांची स्थिती अधिक बळकट झाली.

## स्त्रीवादी सैद्धांतिक चौकट :-

या संशोधनाचे विश्लेषण स्त्रीवादी दृष्टीकोनातून केल्यास महिलांच्या स्थानातील बदल अधिक स्पष्टपणे समजून येतात. स्त्रीवादानुसार समाजातील सत्तासंबंध हे लिंगाधारित असतात आणि पितृसत्ताक व्यवस्था महिलांच्या संधी मर्यादित करते. प्राचीन काळात महिलांना काही प्रमाणात बौद्धिक स्वातंत्र्य मिळाले तरी निर्णयप्रक्रियेत पुरुषांचे वर्चस्व होते. मध्ययुगीन काळात समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांच्या हक्कांबाबत जागरुकता निर्माण झाली.

स्त्रीवादी विश्लेषणातून असे दिसते की, महिलांचे सशक्तीकरण हे केवळ सामाजिक सुधारणांवर अवलंबून नसून कायदेशीर शैक्षणिक आणि आर्थिक संरचनामधील बदलांवर ही अवलंबून आहे.

## निरीक्षणे :-

१) महिलांच्या स्थानातील बदल हे समाजरचनेमधील व्यापक परिवर्तनाशी निगडित आहेत.

२) शिक्षण हे महिलांच्या सशक्तीकरणाचे मुख्य साधन ठरले आहे.
३) घटनात्मक समानता असूनही सामाजिक मानसिकतेतील बदल आवश्यक आहे.
४) ऐतिहासिक परंपरा आणि आधुनिक मुल्ये यांमध्ये समतोल राखणे गरजेचे आहे.
५) आधुनिक काळात महिलांचा राजकारण, शिक्षण, उद्योग व प्रशासन क्षेत्रात वाढता सहभाग दिसून येतो.

## निष्कर्ष

सदर संशोधनातून असे स्पष्ट होते की, भारतीय इतिहासात महिलांची भूमिका स्थिर न राहता कालानुरूप बदलत गेली आहे. प्राचीन काळात विशेषतः वैदिक युगात स्त्रियांना शिक्षण धार्मिक विधी आणि सामाजिक जीवनात सक्रिय सहभागाची संधी होती. मध्ययुगीन काळात पितृसत्ताक व्यवस्थेच्या बळकटीमुळे व सामाजिक, धार्मिक बंधनांमुळे महिलांचे स्थान तुलनेने दुय्यम झाले. तथापि आधुनिक काळात सामाजिक सुधारणा चळवळी, शिक्षणाचा प्रसार आणि भारतीय राज्यघटनेतील समानतेच्या तत्त्वांमुळे महिलांचे स्थान अधिक सुदृढ झाले आहे.

यावरून असे दिसून येते की, महिलांची सामाजिक स्थिती ही राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांवर अवलंबून राहिली आहे. आधुनिक भारतात कायदेशीर समानता मिळाली असली तरी प्रत्यक्ष सामाजिक समतेसाठी अजूनही प्रयत्नांची आवश्यकता आहे.

## शिफारशी :-

१) महिला शिक्षणाला प्राधान्य देणे.
२) ग्रामीण भागात जनजागृती कार्यक्रम राबविणे.
३) आर्थिक स्वावलंबनासाठी कौशल्य प्रशिक्षण वाढविणे.
४) लिंगसमतेबाबत शालेय अभ्यासक्रमात समावेश करणे.
५) महिला सक्षमीकरणासाठी इतिहासातील स्त्री शिक्षण, समाजसुधारणा चळवळी आणि महिलांच्या उदाहरणे अभ्यासातून त्यांचा उपयोग आज सामाजिक आणि राज्य शासनामध्ये करणे आवश्यक आहे.
६) महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच महिलांना त्यांच्या अधिकारांविषयी जागरूक करणे अत्यंत आवश्यक आहे.
७) राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांना अधिक संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.
८) महिलांना सक्षमीकरणासाठी इतिहासातील सकारात्मक अनुभवांचा उपयोग करणे आवश्यक आहे.

## पुढील संशोधनासाठी दिशा :-

१) प्रादेशिक स्तरावर महिलांच्या भूमिकेचा अभ्यास

**२) आधुनिक काळातील राजकीय सहभागाचे सखोल विश्लेषण**

**३) शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरणाचा तुलनात्मक अभ्यास**

## संदर्भ सूची :-


१) Ambedkar, B. R. (1948). The untouchables: Who were they and why they became untouchables? Amrit Book Company.

२) Desai, N., & Thakkar, U. (2001). Women in Indian society. National Book Trust.

३) Forbes, G. (1996). Women in modern India. Cambridge University Press.

४) Phule, S. (1998). **स्त्रीशिक्षण विषयक लेखन व पत्रे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.**

५) Roy, R. R. M. (1829/2000). **सतीप्रथा विषयक निवडक लेख.** (Reprint ed.). **लोकवाङ्मय गृह.**

६) Sharma, R. S. (2005). India's ancient past. Oxford University Press.

७) Thapar, R. (2002). Early India: From the origins to AD 1300. Penguin Books.

८) **केळकर**, **क.** (2010). **भारतीय समाजरचना आणि स्त्रीची भूमिका. डायमंड पब्लिकेशन्स.**

९) **पाटील**, **स.** (2015). **भारतीय इतिहासातील स्त्रियांचे स्थान. विद्या प्रकाशन.**